दिव्य मराठी

अकोला सिटी 13-08-2024

# जि. प. प्राथमिक शाळेत सायबर सुरक्षेवर कार्यशाळा; तज्ज्ञांचे मार्गदर्शन



सायबर सुरक्षाबाबत कार्यशाळेत सहभागी मान्यवर.

अकोला | जि.प. मराठी प्राथमिक शाळेत सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी प्रतीक्षा हिवराळे आणि प्रियंका जाधव यांनी ऑनलाइन फसवणूक, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाइट्स कशा ओळखाव्यात याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळा क्विक हिल फाउंडेशन, महाराष्ट्र सायबर यांच्या सहकार्याने घेण्यात आली. कार्यशाळा प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष मुख्याध्यापक तालोट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक व सर्व शाळेचे विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.